॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव संचलित

**कै. श्रीराम रामेश्वर पोद्दार व कै. शालीग्रामजी भारतीया संस्थापित**

महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्र, धुळे

मालेगांव रोड, निसर्गोपचार केंद्रा समोर, धुळे. (०२५६२- २४०६४१)

**"A" Grade**
**NAAC Re–Accredited**
**(4th Cycle)**


जा.क्र.:कबचौउमवि/म.गांधी त.कें.धुळे/निवंध स्पर्धा/92/2024 दि.: 12/12/2024

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक,

-------------------------

-------------------------

विषय:- महात्मा गांधी पुण्यतिथी निमित्त विद्यापीठस्तरीय निवंध स्पर्धेबाबत...

महोदय,

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव संचलित महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्र, धुळे या केंद्रामार्फत प्रामुख्याने महात्मा गांधीजींच्या तत्वज्ञानाचा आणि त्यांच्या कार्याचा प्रचार व प्रसारासाठी तसेच गांधीजींच्या समग्र जीवन तत्वज्ञानाचा अभ्यास व्हावा, विद्यार्थ्यांमध्ये महात्मा गांधी विचाराद्वारे नैतिक मुल्यांची स्थापना होवून सुजान नागरिकांची निर्मिती व्हावी या करीता सातत्याने विविध उपकमांचे आयोजन करण्यात येत असते.

त्या अनुषंगाने राष्ट्रीय सेवा योजना, कबचौउमवि, जळगाव व कबचौउमवि, जळगाव संचलित महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्र, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने दि.**30 जानेवारी, 2025** रोजी महात्मा गांधी पुण्यतिथी निमित्त महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी **विद्यापीठस्तरीय निबंध स्पर्धा** आयोजित करण्यात येत आहे. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परिक्षेत्रातील कनिष्ठ/वरीष्ठ महाविद्यालये, परिसंस्था व शैक्षणिक विभाग यामध्ये नियमित शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना या स्पर्धेसाठी प्रोत्साहीत करुन सहभागी करावे. स्पर्धेचे विषय, नियम व अटी पूढे नमूद केल्याप्रमाणे आहेत.

**निबंध स्पर्धेचा विषय:-**

१.महात्मा गांधी आणि ग्रामस्वराज्य.

२.गांधीजी आणि अहिंसा.

३.गांधीजींचे शिक्षण विषयक विचार.

४.गांधी विचार काळाची गरज.

५.महात्मा गांधीजींचे तत्वज्ञान.

६.महात्मा गांधी आणि महिला सबलीकरण.

**स्पर्धेचे नियम व अटी :-**

1. स्पर्धेचे माध्यम मराठी, हिंदी व इंग्रजी राहील.
2. कबचौउमवि परीक्षेत्रातील कनिष्ठ/वरीष्ठ महाविद्यालये, परिसंस्था, शैक्षणिक विभाग या मध्ये नियमित शिक्षण घेणारे दहा विद्यार्थी स्पर्धेत सहभागी होऊ शकतील.
3. स्पर्धकाचे वय स्पर्धेच्या दिवशी 25 वर्षांपेक्षा कमी असणे अनिवार्य आहे.
4. स्पर्धकांनी आपली प्रवेशिका एकत्रीत करुन महाविद्यालयामार्फत दि.20 जानेवारी, 2025 पूर्वी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव संचलित महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्र, मालेगाव रोड, निसर्गोपचार केंद्रासमोर, धुळे येथे प्रत्यक्ष किंवा पोस्टाने पाठवावीत.
5. निबंधाची शब्द मर्यादा 1500 शब्द राहील.

...2

6. स्पर्धेसाठी कोणत्याही स्वरुपाचे शुल्क आकारण्यात येणार नाही.
7. स्पर्धेसाठी कोणताही खर्च केंद्रामार्फत केला जाणार नाही, पोस्टेज व इतर खर्च त्या त्या महाविद्यालयाने करावेत.
8. वरील विषयांपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध पानाच्या एका बाजूने समास सोडून, स्व हस्ताक्षरात व सुवाच्च अक्षरात लिहीलेला असावा. मुखपृष्ठावर स्पर्धकाने आपले नाव, वर्ग, रोल नंबर, महाविद्यालयाचे नाव व निबंधाचे शिर्षक लिहीणे अपेक्षीत आहे.
9. या स्पर्धेसाठी परीक्षक मंडळाचा निर्णय अंतिम राहील.
10. स्पर्धेचा पारितोषिक वितरणाची तारीख व वेळ महाविद्यालयांना पत्राद्वारे व वृत्तपत्रात बातमीद्वारे कळविण्यात येईल.
11. सदर स्पर्धेसाठी पारितोषिकाचे स्वरुप (प्रथम, द्वितीय, तृतीय,उत्तेजनार्थ पारीतोषिक प्राप्त विद्यार्थ्यांकरीता)-स्मृतीचिन्हे, प्रशस्तीपत्र व पुस्तक इ.स्वरुपात भेटवस्तु स्वरुपात राहील.
12. स्पर्धेत सहभागी सर्व स्पर्धकांना सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आपल्या सहकार्यामूळे हा उपक्रम यशस्वी होईल याची आम्हास जाणीव आहे. आपण आपल्या महाविद्यालय/परिसंस्थेतील 10 स्पर्धकांना स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहीत करावे ही विनंती.

कळावे, धन्यवाद.

अधिक माहितीसाठी संपर्क:- डॉ.संजय ढोडरे, कार्यकारी संचालक, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव संचलित महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्र, मालेगाव रोड, निसर्गोपचार केंद्रासमोर, धुळे.

कार्यालय दूरध्वनी क.02562-240641, भ्रमणध्वनी क्र.9822533642.

आपले विनित,

प्रा. डॉ. सचिन नांद्रे
संचालक,
राष्ट्रीय सेवा योजना, कबचौउमवि, जळगाव

प्रा. डॉ. संजय ढोडरे
कार्यकारी संचालक,
कबचौउमवि, जळगाव संचलित महात्मा गांधी तत्वज्ञान केंद्र,धुळे